**संदर्भः—** 1. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. B.(Gen)-5601/57/2024/1812, Dated 03rd October, 2024.
2. जिल्हा न्यायालय,उस्मानाबाद यांचे आस्थापनेकरीता लघुलेखक ग्रेड–3 या पदाची दिनांक 04 ऑक्टोबर, 2024 रोजी प्रसिध्द करणेत आलेली निवड यादी.
3. Letter of the Hon'ble Registrar (Inspection-I) High Court, Bombay Confidential letter No. B (Gen)-5601/57/2026/103, Dt. 1st July, 2026.
4. सल्लागार समिती, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे दिनांक 01 जुलै, 2026 रोजीचे बैठकीचे इतिवृत्त.

# आदेश

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद हे खालील कर्मचारी यांचे प्रथम नियुक्तीबाबतचे आदेश खालीलप्रमाणे निर्गमित करितात, हे आदेश **दिनांक 07 जुलै, 2026 रोजी** मध्यान्हपूर्व पासुन अंमलात येतील.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव, पद व ठिकाण | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| 1)* | **कु.अनुजा ज्योतीबा पाटील,**<br>(लघुलेखक ग्रेड–3, निवड यादी–2024, उमेदवार क्र.07)<br>रा.मार्डी, ता.उत्तर सोलापूर, **जि.सोलापूर.** | ***स्थानापन्न तदर्थ लघुलेखक ग्रेड–3,**<br>2रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, **तुळजापूर** येथे श्री.एम.आय.एस.एफ.कादरी, यांचे पदोन्नतीमुळे रिक्त होत असलेल्या पदी. |

(*)कु.अनुजा ज्योतीबा पाटील हया लघुलेखक ग्रेड–3 पदाचे निवड यादी–2024 मधील उमेदवार क्र.07 असुन त्यांची तदर्थ लघुलेखक ग्रेड–3 या पदावर खालील अटींचे अधिन राहुन तात्पुर्ती नेमणूक करण्यात येत आहे. कु.अनुजा पाटील यांना सुचित करण्यात येते की, नियुक्तीच्या दिनांकापासून 1 वर्षाचे कालावधीत **इंग्रजी आणि मराठी भाषेतील पात्रता श्रुतलेखन परीक्षा उत्तीर्ण** होणे त्यांचेवर बंधनकारक राहील. इंग्रजी आणि मराठी श्रुतलेखन पात्रता परीक्षा उत्तीर्ण न केल्यास त्यांची सेवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्यात येईल. तसेच त्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी रूजु होते वेळी त्यांची नेमणूक ही तदर्थ लघुलेखक ग्रेड–3 म्हणून करण्यात आलेबाबतचे व नियुक्तीपासुन 1 वर्ष कालावधीचे आत इंग्रजी आणि मराठी भाषेतील श्रुतलेखनाची परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची सेवा समाप्त केली जाईल याची समज मिळालेबाबतचे व मुदतीत परीक्षा उत्तीर्ण होणेकरीताची समज मिळालेबाबत **अंगिकारपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तुळजापूर यांना कळविण्यात येते की, त्यांचे न्यायालयात उपरोक्त उमेदवार तदर्थ लघुलेखक ग्रेड–3 पदावर नियुक्तीचे ठिकाणी हजर झालेनंतर त्यांना वरील अटींची समज देवून समज मिळालेबाबत पोहंच व अंगिकारपत्र घेवून या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावे.

सदरची नेमणूक ही अस्थायी स्वरूपाची असुन सदरील उमेदवारांना केंव्हाही कोणत्याही प्रकारची नोटीस न देता कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहतील. जर त्यांना सेवा सोडण्याची ईच्छा असल्यास त्यांना प्रथम एक महिन्याचे वेतन भरावे लागेल किंवा त्या ऐवजी एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल. त्यांनी आदेशाच्या दिनांकापासून सात (07) दिवसांचे आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे. कामावर हजर होतेवेळी त्यांना भारतीय घटनेप्रमाणे शपथ घ्यावी लागेल. जर ते मुदतीत कामावर हजर झाले

नाहीत तर त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्य करण्यात येईल व त्यांचे नाव लघुलेखक ग्रेड–3 पदाचे निवड यादीतुन कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

नवनियुक्त तदर्थ लघुलेखक ग्रेड–3 या पदावर नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारांनी कर्तव्यावर हजर झालेनंतर पंधरा दिवसाच्या आत मत्ता व दायित्वचे प्रपत्र विहित नमुन्यात जिल्हा न्यायालयास सादर करावे.

संबंधीत कार्यालय प्रमुख यांना सुचित करण्यांत येते की, स्थलांतरीत झालेले कर्मचारी यांना जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद परिपत्रक कमांक काव्यवि/प्रशा/5071/2012, दिनांक 19 मे, 2012 चे अनुषंगाने आपआपसांत चार्ज (कार्यभार हस्तांरित) लेखी घ्यावा व द्यावा याबाबत सूचना देण्यांत याव्यात. तसेच सदर परिपत्रकाचे तंतोतंत पालन करणेबाबत सुचित करावे.

Abhishri D Deo 06/07/2026.

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद. [] **( अभिश्री ज्ञा.देव )**
दिनांक :०६ जुलै, 2026 [] प्रमुख जिल्हा न्यायाधीश, **उस्मानाबाद.**

जा.क./काव्यवि/प्रशा/ ५३३४ /2026.
दिनांक : ०६ जुलै, 2026.

**याची एक प्रत माहिती व कार्यवाहीस्तव अग्रेषित –**

1) सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, **तुळजापूर.**
2) 2रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, **तुळजापूर.**
3) कार्यालयीन आदेश संचिका.

**याची एक प्रत :–**

1) सहाय्यक अधिक्षक, रो.वि.ले.शाखा, जिल्हा न्यायालय, **उस्मानाबाद.**
2) क.लिपीक,संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांना सुचित करण्यांत येते की, सदरील आदेश हे जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे अधिकृत संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करावेत.
3) **कु.अनुजा ज्योतीबा पाटील,** (लघुलेखक ग्रेड–3, निवड यादी–2024, उमेदवार क.07) रा.मार्डी, ता.उत्तर सोलापूर, **जि.सोलापूर** **(By RPAD)**